दाखल तारीख : ३०/०९/२०१५
नोंदणी तारीख : ३०/०९/२०१५
निकाल दिनांक : २१/०३/२०१६
कालावधी : वर्षे महिने दिवस

**<u>पुणे येथील १८वे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पुणे.यांचे न्यायालयात,</u>**

( **<u>पीठासीन अधिकारी</u>** : श्रीमती एस.पी. नलगे– केस्तीकर )

**<u>नियमित फौजदारी खटला क्र. ४६३७/२०१५</u>**
**<u>निशाणी</u>**

महाराष्ट्र शासन .... **फिर्यादी**
तर्फे लोणीकंद पोलीस ठाणे

**विरूध्द**

श्री. अनंत काशीराम चव्हाण
वय– ४५ वर्षे धंदा– मजुरी .... **आरोपी**
रा. श्रावणी ढाबा लोणीकंद ता. हवेली जि. पुणे

..........................................................................................

**उपस्थिती :**
**अभियोगपक्षा तर्फे : श्रीमती लक्का वकील**
**आरोपीतर्फे : श्रीमती गोटे वकील**

..........................................................................................

**<u>न्यायनिर्णय</u>**

( निकाल तारीख २१ मार्च, २०१६ )

आरोपी विरूध्द मुंबई प्रोव्हिबिशन कायदा कलम ६५ ड अन्वये दोषारोपपत्र दाखल आहे.

२. **<u>फिर्यादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.</u>**

दि. ७/०७/२०१३ रोजी फिर्यादीस बातमीदाराकडून खात्रीलायक बातमी मिळाली की, पेरणे गावच्या हद्दीत पाटील वस्तीचे पूर्वेस ओढयाकाठी गावठी दारूची निर्मिती केली जाते. सदर खात्रीलायक बातमीनुसार फिर्यादी, निरीक्षक श्री. युवराज शिंदे व दोन पंच असे सर्वजण मिळून बातमीच्या ठिकाणी सरकारी वाहनाने गेले. तेथे ओढयाकाठी एक इसम एक लोखंडी बॅरल व पस्तीस

लिटरचे क्षमतेचे तीन कॅनसह दिसून आला. त्याच्या जवळ जावून तो तेथे काय करीत आहे याबाबत विचारणा केली असता त्याने गावठी दारूची निर्मिती करीत असल्याचे कथन केले. खड्डयामध्ये असलेले रसायन गावठी दारू बनविण्यासाठी तयार झाले की नाही ते पहात असल्याचेही कथन केले. तेथे असलेल्या पाचशे लिटर क्षमतेच्या खड्डयामधील पिवळसर रंगाचा वास घेतला असता त्याला गोडसर गुळ मिश्रित रसायनाचा वास आला. सदर रसायन हे गावठी दारू तयार करण्यासाठी आवश्यक असल्याची खात्री झाली. तेथे असलेल्या पस्तीस लिटरच्या तीन कॅनमधील दारूचा वास घेतला असता त्याला आंबट, उग्र, गावठी हातभट्टीचा दारूचा वास आल. त्यामुळे त्या इसमास त्याचे नाव विचारले व त्याचेविरूध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्याद गु.र.क्र. १६५/२०१३ ने नोंद होवून ती पुढील तपासाकरीता निरीक्षक वाय.एस.शिंदे, निरीक्षक राज्य उत्पादक शुल्क विभागीय यांचेकडे वर्ग केली. सदर तपासी अधिका—याने आवश्यक त्या साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासादरम्यान आरोपीने त्याच्या कब्जात गावठी हातभट्टीची दारू विक्री करणेकरीता निर्मिती करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरूध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले.

४. आरोपी हजर झालेवर त्याचेविरूध्द दोषारोप नि. ३ निश्चित करण्यात आला. सदर दोषारोप त्याला वाचून समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून प्रकरण पुढे चालवायचे असल्याचे कथन केले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात येणारा जबाब नि. १० नोंदविण्यात आला. त्याचेविरूध्द खोटी केस केल्याचे कथन केले.

५. अभियोग पक्षातर्फे विधिज्ञांचा व आरोपीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांवरून व युक्तीवादावरून खालील मुद्दे माझे विचाराधीन निघाले असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहीत खाली नोंदवित आहेत.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १) अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दि. ०७/०६/२०१३ रोजी १९:३० ते २३:३० वाजण्याच्या दरम्यान पेरणे गाव, पाटील वस्ती येथे आरोपी बेकायदेशीररित्या प्रोहिबिशनचा मालाची विक्री करणेकरीता निर्मिती करीत असताना मिळून आला? | नाही |
| २) काय आदेश? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिंमासा

६. अभियोग पक्षाने आरोपीवरील आरोपी शाबित करण्यासाठी याकामी दोन साक्षीदारांच्या साक्षी नोंदविलेल्या आहेत. साक्षीदार क्रमांक १ फिर्यादी गोरख महादेव नीळ (नि.६), साक्षीदार क्रमांक २ युवराज शेशेराव शिंदे तपासी अधिकारी (नि.८), यांना तपासलेले आहेत. याकामी अभियोग पक्षाने जप्ती पंचनाम्यावरील पंचाची साक्ष नोंदविलेली नाही. सरकारी वकीलांच्या तोंडी सबमिशनवरून त्याचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दा क्रमांक १ करीताः—**

७. आरोपीवरील आरोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी हा घटनेदिवशी विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी गावठी दारूची विक्री करणेकरीता उत्पादन करीत होता असे शाबित करणे आवश्यक आहे.

८. साक्षीदार क्रमांक १ फिर्यादी यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता दि. ७/६/२०१३ रोजी ते निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथक येथे जवान म्हणून कार्यरत असताना त्याला माहिती मिळाली की, परेणे गावच्या हद्दीत पाटील वस्तीच्या पूर्वेस ओढयाकाठी गावठी हातभट्टीची दारू निर्मिती केली जाते. त्यानंतर तो स्वतः, निरीक्षक व दोन पंच

असे बातमीच्या ठिकाणी गेले. तेथे ओढयाकाठी बसलेला इसम खड्डयातील रसायन पहात होता. त्याच्याजवळ जावून त्याचे नाव विचारले असता त्याने धनाजी संभाजी परदेशी असे सांगितले. त्याने तो गावठी दारूकरीता लागणा–या कच्चा रसायनाची पाहणी करीत असल्याचे सांगितले. त्याच्या जवळी पाचशे लिटरच्या दोन खड्डे, एक भट्टी बॅरल, पस्तीस लिटरचे तीन प्लॅस्टिक कॅन यांची पाहणी केली असता त्यामध्ये पाण्यासारखा पातळ पदार्थ मिळून आला. त्याचा आंबट उग्र वास होता. त्यामुळे त्यांची तेथे गावठी हातभट्टीची दारूची निर्मिती होत असल्याची खात्री झाली. मिळरलेल्सर मुद्देमालापैकी त्याने १८० एमएलच्या बाटलीत जप्त रसायन घेतले. त्यावर पंचांच्या सहयांचे लावून सिल केले. सदर ठिकाणी मिळालेला माल नाशवंत असल्याने जागीच नाश केला. घटनास्थिचा पंचनामा केला. सदर साक्षीदाराने त्याची फिर्याद शाबित केलेली आहे.

९. सा. क्र. १च्या साक्षीस सा.क्र. २ जे यातील तपासी अधिकारी आहेत. त्यांनी पुष्टी देणारी साक्ष नोंदविलेली आहे. सदर साक्षीदाराने याकामातील जप्ती पंचनामा (नि.९) अन्वये शाबित केलेला आहे. परंतु सा.क्र. १ व २ च्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्याने गुप्त बातमीची नोंद स्टेशन डायरीला केली नाही, बातमीची शहानिशा करण्यासाठी बोगस गि–हाईक पाठविले नाही, जप्त मालाची शहानिशा करण्यापूर्वी नमुन्यासाठी वापरणा–या बाटल्यांचा पंचनामा केला नाही हे मान्य व कबूल केलेले आहे. सा.क्र. २ ने जप्त माल रासायनिक पृथकरणासाठी अहवालाकरीता पाठवून दिल्याचे कथन केले आहे. सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता जप्त दारूमध्ये इथिल अल्कहोल असल्याचे दिसून येते. परंतु नमुन्याकरीता सदर माल जप्त केलेपासून पंचवीस दिवसांनी अहवाल पाठविल्याचे सा.क्र. २ ने कबूल केलेले आहे. अभियोग पक्षाने याकामी जप्ती पंचनाम्यावरील एकाही पंचाची साक्ष नोंदविलेली नाही. जरी जप्ती पंचनामा याकामी तपासी अधिका–याने शाबित केले असे गृहित धरले तरी त्याने पंचनामा करणेपूर्वी आवश्यक गोष्टींची पूर्तता केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेली दारू ही गावठी हातभट्टीची होती असे गृहित धरणे योग्य होणार नाही.

१०. अशारितीने सा.क्र. १ व २ यांच्या साक्षीवरून आरोपी हा घटनेदिवशी नमूद ठिकाणी , वेळी गावठी हातभट्टीची विक्रीकरीता निर्मिती करीत होता असे सबळ पुराव्यानिशी शाबित केलेले नाही. सबब मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ः—</u>**

११. अभियोग पक्षाने आरोपीवरील आरोप सबळ पुराव्यानिशी शाबित न केल्याने सदर मुद्दयाचा निष्कर्ष मी खालील आदेशाने पारित करीता आहे.

## आदेश

१. आरोपीची भारतीय प्रोहिबिशन कायदा कलम ६५ड च्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. याकामी जप्त असलेला मुद्देमाल अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क अधिका—याकडे पुढील कारवाईसाठी पाठवावा.

पूणे

दि. २१/०३/२०१६

(एस.पी.नलगे—केस्तीकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पूणे

Remarks :

I affirms that the contents of this P. D. F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of the Court :- S.P.Nalage
18th Joint Civil Judge, Junior Division & Judicial Magistrate First Class, Pune.

Name of the Steno :- A.P.Shende

Date of judgment :- 21/03/2016

Judgment uploaded on :-23/03 /2016